# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


संदर्भ क्र. मविनिआ/माअअ/अपील/०३/२०१८/०३५२

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : १८.१२.२०१७ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : १७.०१.२०१८ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : २०.०२.२०१८ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | : १३.०३.२०१८ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**
**(माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**<u>अपील क्र. ०३/२०१८</u>**

**अपीलकर्ता :** श्री सुदिन रमेश प्रधान

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२०१७ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत अर्ज केला. प्रतिवादी यांनी त्यांचे पत्र दिनांक १७.०१.२०१८ नुसार अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक २०.०२.२०१८ ला वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २१.०२.२०१८ ला नोटिस पाठवून अपिल सुनावनीची संधी दिली व दिनांक ०७.०३.२०१८ ला अपिलार्थी व प्रतिवादी यांना आपले समक्ष बाजू मांडण्याची संधी दिली. अपिलार्थी गैरहजर होते व माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहून आपले मौखिक म्हणणे अपिलीय अधिकारी यांचे समक्ष सादर केले.

३) माहिती अर्ज लक्षपूर्वक गृहित धरुन व त्याला प्रतिवादी यांचे आदेश/उत्तर व या अपिलातील मुद्यांना धरुन नास्तितील पुराव्याच्या आधारे अपिल निकाली काढण्यात येत आहे.-

**मागितलेली माहिती:-**

१. १३-१२-२०१७ रोजी अर्जदारानी रिलायन्स इन्फ्रास्टक्चर टोल फ्रीवर दिलेल्या तक्रारी बाबत (तक्रार नोंदणी २५२७११२१७) जी कायदेशीर कारवाई केली त्याची माहिती मिळावी. स्ट्रीट पोलाचे रंग व कुंडया लटकवण्याबाबत.

2. आंबेडकर उद्यान ते आचार्य उद्यान येथील लाईटच्या खांबांचा कवर बदलणे व त्यावर कुंडया अडकवण्यासाठी ज्या कोणी प्रस्ताव दिला असेल ती प्रस्ताव व रिलायन्स व्यवस्थापन यांनी दिलेली मान्यता यासह आवक जावक वहीतल्या नोंदीसह मिळावे.


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

आपण केलेल्या FIR वा कायदेशीर पत्रव्यवहाराच्या प्रती साक्षांकित मिळाव्या इतर पत्रव्यवहार /कागदपत्रे छायांकित स्वरुपात मिळाव्यात.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

अपीलकर्ता याच्या मुददा क्र. १ व २ ला उत्तर: अशा प्रकारची माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले आहे.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

माझ्या १८.१२.२०१७ रोजीच्या माहिती अर्जाची निशुल्क व सत्य माहिती न मिळाल्याने.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांचे दि. २८.०२.२०१८ च्या पत्राला अनुसरून या कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे व त्यासंबंधाने केंद्रिय माहिती आयोगाच्या निवाळयाचे संदर्भ देवून अर्ज योग्य प्रकारे निकाली काढला आहे.

सबब वरील अपिलाचे निकाली प्रकरणात हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नसल्याने अपिल खारिज करण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

**निर्णय**

१) अपिलार्थी यांची अपिल खारिज करण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**
**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपीलीय अधिकारी.**

प्रति,
श्री सुदिन रमेश प्रधान,
३४/१२३६, सुभाषनगर,
चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.

प्रतीलिपी- जनमाहिती अधिकारी, मविनिआ यांना निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता रवाना.

**(अनिलकुमार उके)**
**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपीलीय अधिकारी.**